


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# "आदिवासी जमातीच्या साहित्यातील स्त्री जीवन"

प्रा.डॉ. पी. आर. जाधव
मराठी विभागप्रमुख,
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

प्रस्तावना:-

भारतात अनेक जाती-जमातींचे, संस्कृती- संप्रदायाचे लोक प्राचीन काळापासूनच वास्तव्यास आहेत. जाती व्यवस्था हे भारतीय समाज व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग मानले जाते. भारतात दीर्घकाळ आर्य- अनार्य हा संघर्ष चाललेला दिसतो. यातूनच पुढे आदिवासींच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाल्याचे पहावयास मिळते.

मुळात आदिवासी समाज हा नागरी वसाहतीपासून पूर्वपार लांब राहणारा, दऱ्या, डोंगर, घनदाट अरण्य, रानावनात राहणारा म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातील प्रामुख्याने विदर्भात नऊ जिल्ह्यांमध्ये आदिवासी जमातींचे प्राबलल्याने वास्तव्य आढळते.

आदिम संस्कृती ही सनातन, अभिजात आणि समृद्ध संस्कृती आहे. आपल्या पूर्वेतिहासातील अनेक प्रथा परंपराचे जतन त्यांनी केले आहे. विदर्भात प्रामुख्याने माडिया, कोरकू, परधान, कोलाम, आंध, गोंड, बंजारा या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आदिवासी म्हणजे लोक समाजाचा प्राचीनतम भाग, त्यांच्या प्रथा, परंपरा, चालीरीती, भाषा, पोशाख, सामुदायिक जीवन, सण-उत्सव यातून त्यांच्या जीवनाचा परिचय होतो.

अशा विविधरंगी संस्कृतीच्या अंगा खांद्यावर खेळणारी आदिवासी जमात आहे. या आदिवासी जमातीच्या लोक परंपरेतून, त्यांच्या लोकगीतातून त्यांचे एकंदरीत जगणे- वागणे आपणास अभ्यासता येते.

प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी जमातीच्या लोकसाहित्यातून व्यक्त झालेल्या स्त्री जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी समाजाचा अभ्यास करताना या समाजात स्त्रियांची काय परिस्थिती आहे याबाबतचा विचार अभिप्रेत आहे.

साधारणतः स्त्री ही कोणत्याही समाजातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. स्त्रीशिवाय समाजाची कल्पनाच अशक्य आहे. आदिवासी समाजात स्त्रियांचा दर्जा कोणता व स्त्रीची भूमिका कोणती हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

आदिवासी स्त्रियांचे आदिवासी समाजातील स्थान व भूमिका पाहताना प्रथमता: आदिवासी म्हणजे कोण हे पाहणे महत्त्वाचे राहील? आदिवासी म्हणजे कोण? "जात" हा शब्द मराठीत 'जन' या धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ 'जन्म' असा आहे. एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय'असे मानले जाते. आदिवासीविषयी डॉ .डी. एन. मुजुमदार म्हणतात---

"जमात किंवा आदिवासी समाज हा समान जीवन पद्धती असणारा, समान भाषा बोलणारा, व व्यवहार, विवाह वगैरे बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा आणि एकाच भूप्रदेशावर वास्तव करणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण आहे" (१)

आदिवासी जमातीत कुटुंबाला अत्यंत महत्त्व आहे. काही जमातीत पितृसत्ताक पद्धती बरोबरच मातृसत्ताक पद्धती ही अस्तित्वात असल्याचे दिसते. यावरून आदिवासी मध्ये स्त्रियांचा दर्जा बऱ्याच अंशी पुरुषा बरोबरीचा असल्याची दिसून येते. मेळघाटातील कोरकू जमातीत लग्नासाठी मुलीला पैसा, धान्य देण्याची पद्धत आहे, नवरा मुलगा गीतातून म्हणतो--

"गांगुल्या गांगुल्या डोडो S मा ।
गांगुल्या दो SS डो या ।।धृ।।
गांगुल्या गोम आय गांगुल्या

डोमाय इंजे तोरवे

कोन्जे लोग तोरे माय,

डोऽऽडो.||१||" (३६)

या गीतातून नवरा मुलगा मुलीला देण्यासाठी काय- काय जमवावे लागेल हे सांगतो. विवाहानंतर मुलगी पतीकडे राहायला जाते, कोरकू गीतात स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णनही मनोवेधक दर्शविलेले दिसते.

(१) कोरकू समाज :-

कोरकू जातीमध्ये चार प्रमुख उपजाती आढळतात. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाही. कोरकू स्त्रिया मध्यम उंचीच्या व वर्णाने काळ्या असतात. त्यांच्या जातीमध्ये विवाह हा विधी महत्त्वाचा मानला जातो. वयात आल्यानंतर मुलगी शोधली जाते. जात पंथाच्या समोर वधूमूल्य ठरते, या जमातीत स्त्रियांना घटस्फोटही घेता येतो व विधवांना विवाह करता येतो. या समाजामध्ये बहुपत्नीत्वाची पद्धत प्रचलित आहे.

(२) माडिया गोंड समाज :-

हल्लीच्या गडचिरोली, चंद्रपूर व त्या आसपास पसरलेल्या अरण्यात माडिया गोंड या आदिम जमातीची वस्ती आहे. या जमातीत स्त्री अत्यंत साधी सरळ प्रामाणिक आहे. माडिया स्त्रीच्या जीवनामध्ये महत्त्वपूर्ण क्षण म्हणजे विवाह होय. ती आपल्या मनपसंत जोडीदाराशी विवाह करू शकते. आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या जमातीत दिसते. माडिया जमातीत "घोटूल" ही संस्था आहे यामध्ये युवक आणि युवती मुक्तपणे जीवन जगतात. बरोबरीच्या मुलांशी खेळीमेळीचे त्यांचे संबंध असतात. 'घोटूल'च्यापुढे होळीला तरुण-तरुणी हातात हात घेऊन एकमेकांसोबत नृत्य करतात. यात शृंगार गीते व जीवनसाथी विषयी गीते असतात. विवाहाच्या स्वातंत्र्यामुळे माडिया युवती वर नापसंत

असल्यास स्पष्टपणे सांगते. या जमातीत हुंडा हा प्रकार नसला तरी वधूमूल्य हा प्रकार आहे, ते खालील गीतावरून दिसून येते.

" रि रि लो रे रे ला

जोडी जोडी इनदादी

वंजी वाल वाल दादी वंजी वाल वाल।।धृ।।"

गाडा नुका दोसते दादी

उसके निवा जोडी दादी

पुनम जोडी दोरकी दादी.." (५७)

उपरोक्त गीतातून नवऱ्या मुलास जेव्हा गाडीभर तांदूळ देशील तेव्हा तुला नवरी मिळेल, बायको फुकट मिळत नाही. त्यासाठी तांदूळ व बोकड द्यावा लागतो. वधूला विवाहपूर्वी मूल्य देण्याची प्रथा आहे. एखादा तरुण मूल्य न देऊ शकणारा तरुण वधूच्या घरी कराराने काम करतो.

या जमातीत विवाहपूर्व स्त्रीचे जीवन अत्यंत खेळीमेळीचे व स्वातंत्र्याचे असते. मात्र विवाहानंतर तिच्यावर कडक निर्बंध घातल्याचे दिसून येते. लग्नानंतर पती, मुले आणि संसार यातच तिचे जीवन गुरफटून गेल्याची दिसते. पुरुषापेक्षा संसाराची जास्तीत जास्त जबाबदारी स्त्रिया या समाजात सांभाळताना दिसतात. माडिया स्त्रिया श्रद्धाळू व निसर्गपूजक आहेत. परंतु अज्ञानामुळे त्यांच्या अंधश्रद्धा भरलेली आहे. आजारपणात औषध घेण्यापेक्षा जादूटोणा, तंत्रमंत्र यावर विश्वास ठेवताना त्या दिसतात. विवाह नंतर माडिया स्त्री "घोटूल"मध्ये जाऊ शकत नाही. रजस्वला स्त्रियांसाठी गावाबाहेर तीन दिवस राहण्यासाठी जागा असते. एकंदरीत माडिया स्त्री विवाहपूर्वी जेवढी मुक्तपणे जगते ती विवाहानंतर जगताना दिसत नाही. कारण प्रथा ,परंपरा याला ती महत्त्व देते.

(३) कोलाम जमात:--

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात कोलाम आदिवासी जमात ही मोठ्या प्रमाणात राहतात. त्यांच्यात आजही जुन्या रूढी परंपरा पहावयास मिळतात. गोंड संस्कृतीप्रमाणे त्यांची कोलामी संस्कृती आहे. कोलामांचा कोणताही सण, उत्सव नृत्याशिवाय साजरा होत नाही. सण- उत्सवात संपूर्ण रात्र स्त्री- पुरुष नृत्यात भाग घेतात. दंडारी हा कोलामांचा नृत्य प्रकार आहे. दसरा, होळी, गावबांधणी याला ते विशेष महत्त्व देतात. या जमातीतही मुलीला 'देज' (वधूमूल्य) द्यावे लागते. तो देऊ न शकल्यास तो सासरच्या घरी 'ढगल्या' म्हणजे घरघडी राहतो. दसऱ्याला शमीच्या झाडावर त्यांचे देव बांधून ठेवलेले असतात. स्त्री- पुरुष तिथे जाऊन त्याची पूजा करीत असतात आणि गाव बांधीच्या वेळेस माहूरच्या देवीची ते गीत गाताना म्हणतात---

"माहुसा देवी तांदुंग वान्तिना
तांदुंग तोदा ?
बारा मयनीला पुंजा
तिनेंग वात्तिगं ! " (१०५)

माहूरची देवी बारा महिन्यांनी पूजा घ्यायला आली आणि पूजेचा आनंद लुटायला आली आहे.ती गाव बांधणीचा उत्सव बघायला आली आहे. असा या गीताचा आशय आहे. आदिवासी कोलाम स्त्रिया श्रद्धाळू व निसर्गपूजक आहेत. अनेक देवीदेवतांची त्या उपासना करतात. संकट आले तर त्याला गुळ- फुटाणे नैवेद्य देतात. त्या जमातीत विवाहगीतातून वधूमंडपी विवाह लावण्याची प्रथा दिसते. तसेच "आमची वधू किती सुंदर आहे!" हे वराकडून स्त्रियांना सांगून त्यांची चेष्टाही करताना म्हणते--

"आम्मे पिला कांडदाद,
आम्मे पिला कांडदाद ।

मोगराक नेत पुळकिशा,

पुव्वबराबर कांडदाद ||" (१०९)

वरील गीतातून आमची मुलगी मोगऱ्यासारखी नाजूक आहे असा आशय व्यक्त करते. कोलाम जमातीतील स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार आहे आणि घटस्फोटासाठी जातपंचायतीचा निर्णय सदर जातीत महत्त्वाचा मानला जातो.

(४) परधान जमात:---

गोंडाचे भाट म्हणून ही जात प्रसिद्ध आहे. यवतमाळ जिल्ह्यात त्यांची वस्ती असून त्यांचे अनेक विधी गोंड जमातीसारखे आहेत. या जमातीमध्ये मुलगा मुलीच्या घरी जाऊन विवाहाची इच्छा व्यक्त करतो. या जमातीत गोत्राला महत्त्व आहे. लग्नविधीत हळदीचा प्रकार आहे हळदीच्या प्रसंगी बायका एकत्र येऊन हळदी दळताना गाणी म्हणतात--

"पिची नोरालेवाला वो आगे वो

पिची नोरालेवाला वो |" (६०)

यातून हळद दळण्याला स्त्रियांना बोलावले जाते .या समाजातील स्त्रिया देखण्या असून त्यांच्यामध्ये गोंदण्याची पद्धत आहे. या जमातीत लग्नात मांडव उभारणीसाठी जांभूळ खांब लावतात. मुलाकडून मुलीकडे खर्च सामान मंडपात वाजत गाजत आणल्या जाते.---

"है खर्चा जाते है

है खर्चा जाते,

नवरदेवाच्या मांडवी नवरदेवाच्या मांडवी.!"

यातून मुलींना लग्नात मुलाकडून वस्तू दिल्या जातात. वस्तूद्वारे मुलगा मुलीला हुंडा देतो. रात्रभर ढोल ताशाच्या तालावर लग्न विधी चालतात. तर सासरी जाताना नववधूला सूचना दिल्या जातात---

" बोरे आंदूरा नावे बदनोर दोन
सिरी तो भाग्यवाने नावे कुवारी ओनेर दोन
धरतेरी आवाले नावे कुवारी ना दोन
बोरे तो अनदुरे नावे बैनोर पेपी
राजा का कारूनाले बैनोर पेपी" (६५)

या गीतातून मी पाहुणी आहे, जन्मापासून दुसऱ्याची मालमत्ता आहे असा भाव व्यक्त होतो. मुलगी हे परक्याचे धन ही भावना या जमातीतही आहे. कन्यादानाची प्रथा या जमातीत असून परधान जमातीतील स्त्रियांना दागिन्याची आवड आहे आणि आपल्या पतीकडून त्या सण उत्सवाला दागिने घेतात.या जमातीतही वधूमूल्यांची प्रथा आहे. मुलाकडून वधूमूल्य देत नसल्यास सासऱ्याच्या घरी त्याला राहून सेवा करावी लागते. त्यास "लेमजान्या" असे म्हणतात. या जमातीतील स्त्रियांना विधवा विवाहांना स्वातंत्र्य आहे.

(५) बंजारा समाज:---

व्यापारी या नात्याने ही जमात दक्षिणेतून आली असावी. प्रामुख्यात विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात ही जमात आढळते. यांच्या राहण्याच्या ठिकाणास "तांडा" असे म्हटले जाते. की जमात अनेक विधी प्रसंगी गीते गाऊन आनंद साजरा करतात. होळी या सणाला ते महत्त्वाचे मानतात. मुलीचा विवाह झाल्यानंतर तिला सासरी पाटण्याची प्रथा आहे. सासरी जाताना तिला होणारे दुःख खालील गीतातून व्यक्त करताना ती म्हणते---

"छूट गियाये मारी बापुरी हवेली
खायेशी पीवेशी नांगरी
मारी नायक बापुरी नांगरी
गुजराथनी याडी" (१५)

आई-वडिलांच्या घरी किती सुखी होते याचे दुःख सांगत असताना वरील ओवीतून ती व्यक्त होते. शुभप्रसंगी आराध्य देव- देवतांची पूजा केली जाते. या जमातीत स्त्रिया पुरुषाच्या खांद्याला खांद्या लावून कष्ट करतात. होळीच्या सणाला स्त्री-पुरुष फेर धरून नाचतात, बंजारा जमातीत स्त्रियांना बरेचसे स्वातंत्र्य असल्याचे दिसून येते.

आदिवासी जमातीतील स्त्रियांचे जगणे वागणे हे त्या- त्या जमातीच्या रूढी परंपरेला धरून असल्याचे दिसते. काही जमातीत मर्यादित प्रमाणात आहे. आदिवासी स्त्रियांवर रूढी, परंपरा, श्रद्धा- अंधश्रद्धा, देव-देवता उपासना याचा अधिक प्रभाव असल्याचा जाणवते. यामागे त्यांच्यातील अशिक्षितपणा आहे हे कारण दिसते. मुलांचे पोषण, नवऱ्याला साथ देणे, घर सांभाळणे, सामाजिक मर्यादा पाडणे यांसारख्या सामाजिक व नैतिक मर्यादेवर त्या जास्त भर देताना दिसतात. आदिवासी समाजातील स्त्रियांच्या दर्जाविषयी डॉ. प्रदीप आगलावे म्हणतात---

"आदिवासी समाजातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जा संबंधीच्या विवेचनावरून त्यांचा दर्जा निश्चित करणे अवघड काम आहे. स्त्रियांची विशिष्ट भूमिका पार पाडल्यानंतर त्यांना त्यांच्या भूमिकेनुसार दर्जा प्राप्त होईल असे निश्चित सांगता येत नाही" (२)

एकूणच आदिवासी असो वा प्रगत स्त्रीच्या दर्जाला पुरुषप्रधान समाज किती महत्त्व देते यावरून तिचे महत्व ठरते. आदिवासी स्त्री ही आपल्या कुटुंबाशी भावनिक बंधनाने बांधल्याचे दिसून येते. रूढी परंपरा ह्या जाचक न मानता त्या आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे असे त्या मानतात. त्यामुळे स्वातंत्र्य, पारतंत्र्य, स्त्रीमुक्ती या

गोष्टीच्या त्या फारशा भानगडीत पडताना दिसत नाहीत. दुःखातही सुख म्हणण्याची कला त्यांना अवगत आहे. आणखीन विशेष म्हणजे आदिवासी स्त्रियांच्या मर्यादित गरजा असल्याने प्रगत स्त्रियांपेक्षा त्या सुखी आहेत.

निष्कर्ष:-

(१) आदिवासी स्त्रिया या कुटुंबाला व समाजाला प्राधान्य देतात. (२) सण उत्सवात पुरुषांच्या बरोबर नृत्य गीतात त्या सहभागी होतात, येथे त्यांना पुरुषाच्या बरोबरीने महत्त्वाचे स्थान असते. (३) आदिवासी जमातीमध्ये वधूमूल्य देण्याची पद्धत आहे, वधूमूल्य देऊ न शकणारा वधूकडे काम करायला नवरा मुलगा राहू शकतो. (४) आदिवासी स्त्रियांमध्ये अशिक्षितपणाचे जास्त प्रमाण असल्यामुळे अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात आहे. (६) आदिवासी स्त्रिया आजारपणात डॉक्टरकडे जाण्यापेक्षा देव- देवतांवर, मंत्र-तंत्रावर विश्वास ठेवतात. (७) आदिवासी जमाती मध्ये घटस्फोट, विधवा विवाह, बहुपत्नीत्व या प्रथा प्रचलित आहेत. (८) आदिवासी जात पंचायतीचे निर्णय जमातीतील स्त्री-पुरुषांना बंधनकारक असतात अन्यथा त्यांना जातीबाहेर टाकले जाते.

समारोप:-

एकूणच आधुनिक व प्रगत स्त्रीच्यादृष्टीने आदिवासी स्त्री ही मागास असली तरी ती खंबीरपणे कुटुंबाची जबाबदारी नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून पार पाडताना दिसते. आदिवासी स्त्री ही मुलगी, पत्नी, आई या सर्व भूमिकांना प्रामाणिकपणे न्याय देण्याचा प्रयत्न करते. आदिवासी स्त्रीयांच्या अशिक्षितपणा व अंधश्रद्धा या गोष्टी जर बाजूला काढल्यात तर आदिवासी स्त्री ही आधुनिक स्त्रीशी निश्चितच बरोबरी करते.

संदर्भ:--

(१) "आदिवासींचे समाजशास्त्र" संपा. डॉ. प्रदीप आगलावे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती- 2011, पृष्ठ क्र.-२

(२) तत्रेव-पृष्ठ क्र. - 185.

आधारभूत संदर्भ ग्रंथ:--

(३) "वैदर्भीय आदिवासी जीवन व संस्कृती" संपा. डॉ. शैलजा देवगांवकर, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर- 10, प्रथम आवृत्ती 2006,

(४) "महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य" संपा- डॉ. शैलजा देवगांवकर, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर- 10.

(५) "आदिवासी लोकनृत्य लय, ताल, आणि सूर"- संपा. डॉ. गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०.